# नव्या वाटा नवी क्षितीजे : ग्रंथालय व माहिती शास्त्र

अलका कानेटकर
मुंबई विद्यापीठ

**सर्वद्रव्येषु विद्या एव द्रव्यम् आहुः अनुत्तमम् ।**
**अहार्यत्वाद् अनर्घ्यत्वाद् अक्षयत्वात् च सर्वदा ।।**

म्हणजेच विद्या हेच सर्व धनांमध्ये श्रेष्ठ धन असे म्हणतात कारण ते चोरून नेता येत नाही, त्याचे मोल करता येत नाही आणि ते सदैव अक्षय (कमी न होणारे) असे असते.

तर अशी विद्या मिळविण्यासाठी आपण अभ्यास करतो, म्हणजे आधी माहिती गोळा करतो. खरंच, माहिती हा प्रत्येक क्षेत्राचा पाया आहे. कोणतेही क्षेत्र असो, अगदी मानसशास्त्र—शरीरशास्त्र—आरोग्य यापासून शिक्षण—अर्थकारण—राजकारण—समाजकारण यापर्यंत; धर्म—तत्वज्ञानापासून विज्ञान—तंत्रज्ञानापर्यंत; कला—क्रीडा—मनोरंजनापासून इतिहास—भूगोलापर्यंत — कुठेही माहिती हा महत्वाचा घटक आहे. अगदी भूतकाळाचा अभ्यास करून (उदा. इतिहास), वर्तमानातील परिस्थिती जाणून, पुढील अंदाज बांधायचा (उदा. हवामान, भूकंप) तरी माहिती ही हवीच.

जसं व्यवस्थितपणा म्हणजे हवी ती वस्तू हव्या त्या वेळेला, हव्या त्या जागेवर मिळणं, तसंच अद्ययावत माहितीदेखील आधुनिक युगात हव्या त्या वेळेला, हव्या त्या स्वरूपात मिळणं गरजेचं आहे. इथेच महत्व आहे ते माहितीशास्त्राचे. माहितीचा शास्त्रशुध्द अभ्यास करून, त्याला तंत्रज्ञानाची जोड देऊन, माहितीचे पध्दतशीरपणे व्यवस्थापन करणे म्हणजेच माहितीशास्त्राचा अभ्यास. हेच ग्रंथालयशास्त्राचे (लायब्ररी सायन्स) विस्तारीत रूप.

## बॅचलर ऑफ लायब्ररी ॲड इनफर्मेशन सायन्स (बी.एल्.आय.एस्सी.)

हा अभ्यासक्रम कोणत्याही अधिकृत विद्यापीठाच्या कोणत्याही शाखेच्या पदवीनंतर करता येतो. तसंही आता नुसत्या एका पदवीवर नोकरी मिळत नाही. त्यासाठी दुस—या कुठल्यातरी व्यावसायिक अभ्यासक्रमाची जोड द्यावीच लागते. बी.एल्.आय.एस्सी. हा पदवीनंतरच्या व्यावसायिक (प्रोफेशनल) पदवीचा एक वर्षाचा पूर्णवेळ अभ्यासक्रम आहे.

## मास्टर ऑफ लायब्ररी ॲड इनफर्मेशन सायन्स (एम्.एल्.आय.एस्सी.)

बी.एल्.आय.एस्सी. या पदवीनंतरच्या मास्टर्सच्या या पदवीने तुमची शैक्षणिक अर्हता अधिक दृढ तर होतेच व नोकरीच्या अधिक संधी उपलब्ध होतात.

## सेट/नेट परीक्षा

ग्रंथालय व माहितीशास्त्र विषयात बॅचलर्स, मास्टर्स यासारखे अभ्यासक्रम पूर्ण केले आणि राज्यस्तरीय सेट परीक्षा किंवा विद्यापीठ अनुदान आयोगाची (यु.जी.सी.) नेट परीक्षा उत्तीर्ण केली की आपली शैक्षणिक अर्हता 'विद्यापीठ पातळीवरील अधिव्याख्याता (लेक्चरर)' या पातळीपर्यंत उंचावता येते.

## पीएच्. डी.

शिवाय ग्रंथालय व माहितीशास्त्र या विषयात संशोधन करून पीएच्.डी. करण्याचीही सुविधा आहे.

## नोकरीच्या संधी

जशी तुमची या विषयातली शैक्षणिक अर्हता वाढत जाते, तशा आकर्षक नोकरीच्या संधीही अधिकाधिक मिळतात. या क्षेत्रात करीयर करण्यासाठी भरपूर वाव आहे.

## आय.टी. युगात करियर

सध्याच्या माहिती–तंत्रज्ञानाच्या (आय.टी.) युगात तर या माहितीशास्त्राचे महत्व अनन्यसाधारण आहे. इंटरनेट जरी माहितीचा महासागर मानला तरी या माहितीच्या महापुरातून आपल्याला हवी असलेली माहिती शोधून काढणे म्हणजे गवताच्या ढिगातून एखादी सुई शोधण्यासारखे आहे आणि इथेच मग ग्रंथालय व माहितीशास्त्राचे बॅचलर्स व मास्टर्स विद्यार्थी आपल्या कौशल्याने माहिती जणू अगदी खणूनच काढतात (डेटा मायनिंग) कारण त्याचे त्यांना शास्त्रशुदध शिक्षण दिले जाते.

## शैक्षणिक क्षेत्रातील करियर

महाविद्यालयांमधील ग्रंथालयात सहायक ग्रंथपाल, ग्रंथपाल इ. सारखी पदे आहेत. विद्यापीठ ग्रंथालयात कनिष्ठ ग्रंथालय सहायक, वरिष्ठ ग्रंथालय सहायक, तांत्रिक सहायक, सहायक ग्रंथपाल, उपग्रंथपाल, ग्रंथपाल अशी पदांची चढती श्रेणी आहे. शासकीय ग्रंथालये, वस्तुसंग्रहालये या ठिकाणीही नोकरी मिळू शकते.

## खाजगी/कॉर्पोरेट क्षेत्रातील करियर

शैक्षणिक संस्था, सरकारी, निम–सरकारी संस्था यांच्या बरोबरच खाजगी क्षेत्रातही नोकरीच्या संधी आहेत. उदा. आय.टी.कंपन्या, इंजिनियरिंग कंपन्या, एअरलाईन्स, केमिकल इंडस्ट्री, फार्मास्युटिकल कंपन्या, हॉस्पिटल, पॅरामेडिकल शिक्षणाशी संबंधित संस्था, बहुराष्ट्रीय (मल्टीनॅशनल) कंपन्या, पत्रकारिता व विविध माध्यमे यांच्याशी संबंधित संस्था (उदा. वृत्तपत्रे, आकाशवाणी, दूरचित्रवाणी इ. इ.), बॅका व वित्तीय संस्था, पेटंटस्, लॉ फर्म्स्/सॉलिसिटर फर्म्स्, ऑनलाईन सर्चिंग, अशासारख्या विविध क्षेत्रात या विभागातील पदवीधरांना उत्तम रोजगार उपलब्ध होऊ शकतो.

**संशोधन व विकास संस्था**

संशोधनासाठी माहिती हा मूलाधार आहे. त्यामुळे अशा संस्थांमध्ये ग्रंथालय व माहितीशास्त्राच्या पदवीधरांना उत्तम संधी आहे. उदा. भाभा अणुसंशोधन केंद्र, टाटा इन्स्टिटयूट ऑफ फंडामेंटल रिसर्च, हाफकिन, कॅन्सर रिसर्च संस्था, आय्.आय्.टी. सारख्या उच्च शिक्षण देणा—या संस्था. Digital Preservation, Content Management या सारख्या अत्याधुनिक क्षेत्रांशी संबंधित संस्थांमध्ये नव्या वाटा उपलब्ध आहेत.

**ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग, मुंबई विद्यापीठ**

हा विभाग मुंबई विद्यापीठाच्या विद्यानगरी, कालिना परिसरातील जवाहरलाल नेहरू ग्रंथालयाच्या इमारतीत आहे. अनुभवी व व्यासंगी शिक्षकवर्ग, अभ्यासक्रमाला आवश्यक अशा वाचनसाहित्याचा उदा. पुस्तके, नियतकालिके, प्रबंध, सी.डी. रॉम्स, इलेक्ट्रॉनिक जर्नल्स इ. भरपूर संग्रह असलेलं सुसज्ज दुमजली ग्रंथालय, आधुनिक संगणक प्रयोगशाळा, विद्यापीठाने प्रमाणित केलेले अभ्यासक्रमाचे वाजवी शुल्क, देशभरातील उत्कृष्ठ ग्रंथालयांमध्ये काम करणारा विद्यार्थीवर्ग ही या विभागाची वैशिष्टये आहेत. या विभागातर्फे नियमितपणे राष्ट्रीय स्तरावर चर्चासत्रे, कार्यशाळा, परिसंवाद आयोजित केले जातात. तसेच वेळोवळी यु.जी.सी. प्रायोजित रिफ्रेशर कोर्सेस घेऊन या क्षेत्रातील अद्ययावत माहिती ग्रंथपालांना दिली जाते.

विद्यार्थ्यांना नामवंत ग्रंथालयांची प्रत्यक्ष माहिती व्हावी, यासाठी गेली काही वर्षे या विभागाने देशातील आधुनिक ग्रंथालयांना भेट देऊन अभ्यास—सहली आयोजित केलेल्या आहेत. या सर्व उपक्रमांमध्ये विद्यार्थ्यांचा थेट सहभाग असतो आणि त्यामुळे त्यांच्या अंगभूत सुप्त कलागुणांना वाव मिळतो.

थोडक्यात, ग्रंथालय व माहितीशास्त्राच्या विद्यार्थ्यांना करियरच्या अनेक वाटा उपलब्ध आहेत. असे हे क्षेत्र सर्व स्पर्शी व सर्व विद्याशाखांसाठी उपयुक्त आहे. महत्वाची आहे ती विद्यार्थ्यांची मेहनत करण्याची तयारी, नवीन क्षेत्रांचा मागोवा घेण्याची वृत्ती व त्यासाठी आवश्यक असलेले मार्गदर्शन.

**संपर्कासाठी / आधिक माहितीसाठी पत्ता, दूरध्वनी क्रमांक**
**ग्रंथालय व माहितीशास्त्र विभाग,**
**मुंबई विद्यापीठ,**
**जवाहरलाल नेहरू ग्रंथालय,**
**दुसरा मजला, विद्यानगरी, कालिना, सांताक्रूझ, (पूर्व),**
**मुंबई — ४०० ०९८.**

**दुरध्वनी क्रमांकः— २६५२ ८२०१ विस्तारीत क्रमांकः— २३**
**संकेत स्थळः— www.mu.ac.in**

**२०११—२०१२ या वर्षासाठी प्रवेश अर्ज वरील कार्यालयात उपलब्ध आहेत वेळ स.११ ते सायं.०४**

**शेवटची तारीख — ३० जून, २०११.**